महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

RNI-MAHMAR/2023/89125

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | मंगळवार, दि. २३ डिसेंबर २०२५ | वर्ष २ रे | अंक ४४ किंमत : ५ रु. | पाने ४


## दिन विशेष...

* किसानदिन.

१२९६ : ज्ञानेश्वरांचे बंधू सोपानदेव यांनी ज्ञानेश्वरांच्या नंतर दोन महिन्यांनी सासवड येथे समाधी घेतली.

१७३२ : कापसाचा धागा काढणारे यंत्र निर्माण करणाऱ्या रिचर्ड आर्कराईट यांचा जन्म.

१९२६ : स्वामी श्रध्दानंद यांचे निधन.

सेन्सेक्स ८५,५६७.४८ +६३८.१२ (०.७५%)

डॉलर ₹ ८९.६५

**आजचे तापमान** (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | २९ | १२ |
| दिल्ली | १८ | ११ |
| मुंबई | ३५ | १६ |
| नागपूर | २७ | १० |
| पुणे | ३० | ०७ |

### सुविचार

शिकणं कधीच थांबू नका, कारण ज्ञान हीच खरी संपत्ती आहे.

सुर्योदय - सुर्यास्त

स.-७:०१ संध्या-५:५३

### सोने – चांदी

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)

१,३७,८५०/- २,१९,०००/-

### केळी भाव

नवती : ७५१ ते ७७०

पिल बाग : २५१ ते २७०

कांदे बाग : ----

# राज्यात विजेच्या धक्क्यामुळे पाच वर्षांत ६ हजार ८४८ नागरिकांचा मृत्यू

## • जयंत पाटील यांच्या तारांकित प्रश्नावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची कबुली



वृत्तसंस्था । नागपूर

**राज्यात मागील पाच वर्षांच्या कालावधीत विजेच्या धक्क्यामुळे एकूण ६ हजार ८४८ नागरिकांनी प्राण गमावल्याची धक्कादायक माहिती विधानसभेतील लेखी उत्तरातून उघड झाली.**

राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) जयंत पाटील यांनी विधानसभेत यासंदर्भात तारांकित प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नाच्या लेखी उत्तरात मुख्यमंत्री व ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निवेदन सादर केले. त्यानुसार राज्यात विजेच्या तारा, विद्युत उपकरणे, ट्रान्सफॉर्मर तसेच इतर विद्युत यंत्रणांमधील त्रुटींमुळे मोठ्या प्रमाणावर अपघात घडत असून त्यात निष्पाप नागरिकांना जीव गमवावा लागत आहे.

जयंत पाटील यांनी आपल्या प्रश्नात नमूद केले की, विजेच्या तारेचा धक्का लागून नागरिकांचा मृत्यू होत असतानाही विद्युत निरीक्षकांकडून सरसकट या घटना अपघाती मृत्यू म्हणून नोंदवण्यात येत आहेत. या अपघातांस कारणीभूत व्यक्ती अथवा यंत्रणांविरोधात एकाही प्रकरणात थेट एफआयआर दाखल करण्यात आलेला नाही, अशी तक्रार राज्य मानवी हक्क आयोगाकडे करण्यात आल्याचेही त्यांनी निदर्शनास आणून दिले. या प्रश्नाला मंत्र्यांनी दिलेल्या उत्तरानुसार विद्युत निरीक्षकांकडून प्रत्येक अपघाताची सखोल चौकशी करण्यात येते. चौकशीअंती विद्युत संच मांडणीतील दोषांमुळे अपघात झाल्याचे निष्पन्न झाल्यास संबंधित विद्युत संच मांडणीच्या मालकांवर नुकसान भरपाईची जबाबदारी निश्चित केली जाते. मागील पाच वर्षांत अशा प्रकरणांमध्ये (पान २ वर)

**• चौकशी अहवाल पूर्ण झाल्यानंतर तो संबंधित वीज वितरण कंपनी आणि पोलीस अधिकाऱ्यांकडे पाठवण्यात येतो. त्या अहवालाच्या आधारे पोलीस यंत्रणेकडून एफआयआर नोंदवण्याची कार्यवाही केली जाते, असेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.**

## थोडक्यात



### चांदी १० हजार ४०० रुपयांनी वाढली

**मुंबई ।** जागतिक बाजारपेठेत मौल्यवान धातूंच्या किमतीत सुरू असलेली विक्रमी दरवाढ थांबण्याचे नाव घेत नाहीये. सोमवारी दिल्लीच्या सराफा बाजारात सोने आणि चांदी या दोन्ही धातूंनी आतापर्यंतचा सर्वोच्च स्तर ऑल टाइम हाय गाठला आहे. चांदीच्या किमतीत एकाच दिवसात तब्बल १०,४०० रुपयांची प्रचंड वाढ झाली असून सोन्यानेही १.३८ लाखांचा टप्पा ओलांडला आहे.दिल्ली सराफा बाजारात ९९.९ टक्के शुद्धतेच्या सोन्याच्या दरात आज १,६८५ रुपयांची मोठी वाढ नोंदवण्यात आली. या वाढीसह सोन्याचा भाव १,३८,२०० रुपये प्रति १० ग्रॅम या नव्या ऐतिहासिक उच्चांकावर पोहोचला आहे. गेल्या शुक्रवारी बाजार बंद होताना सोन्याचे दर १,३६,५१५ रुपयांवर स्थिर होते.



### भारताचा श्रीलंकेवर एकतर्फी विजय

**विशाखापट्टणम ।** येथे भारत आणि श्रीलंका महिला संघातील पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेला सुरुवात झाली. मालिकेतील पहिल्या सामन्यात भारताने श्रीलंकेवर ८ गडी राखून एकतर्फी विजय मिळवला. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना श्रीलंकेने १२१ धावांचे लक्ष्य ठेवले होते. प्रत्युत्तरात भारताने जेमिमा रॉड्रिग्जच्या नाबाद ६९ धावांच्या जोरावर केवळ १४.४ षटकांत २ बाद १२२ धावा करून पूर्ण केले. या विजयासह भारताने पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे.

# जळगाव जिल्ह्यात राष्ट्रवादीचा अजित पवार गट जमिनीवर!

## नगरपरिषद निवडणुकीत भाजप-शिंदे गटास यश, अजित पवार गटावर मात

प्रतिनिधी । जळगाव

**जिल्ह्यातील १६ नगर परिषदांसह दोन नगरपंचायतींच्या निवडणुकीत भाजपसह शिवसेनेने (एकनाथ शिंदे) एकूण १४ ठिकाणी आपले वर्चस्व सिद्ध केल्याने महायुतीचा दबदबा कायम राहिला आहे. मात्र, या यशात महायुतीचा घटक पक्ष असलेल्या राष्ट्रवादी (अजित पवार) काँग्रेसचे काडीचे योगदान दिसून आलेले नाही.**



जिल्ह्यात नुकत्याच पार पडलेल्या नगर परिषद व नगर पंचायत निवडणुकांनी जिल्ह्यातील राजकीय समीकरणे स्पष्टपणे समोर आणली आहेत. सत्ताधारी महायुतीत सहभागी असलेले भाजप, शिवसेना (एकनाथ शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) हे घटक पक्ष अपवाद वगळता बहुतांश ठिकाणी एकमेकांच्या विरोधातच निवडणूक रिंगणात उतरले होते. त्यामुळे या निवडणुका केवळ स्थानिक स्वराज्य संस्थांपुरत्या मर्यादित न राहता महायुतीतील अंतर्गत ताकद, संघटनात्मक प्रभाव आणि स्थानिक नेतृत्वाची चाचपणी करणाऱ्या ठरल्या.

दुसरीकडे, शिवसेना शिंदे गटानेही आपली स्वतंत्र ओळख निर्माण करत काही महत्त्वाच्या ठिकाणी सत्ता मिळवली आहे. पाचोरा, भडगाव, पारोळा, चोपडा, अमळनेर आणि मुक्ताईनगर या सहा नगरपरिषदांमध्ये शिंदे गटाचे नगराध्यक्ष निवडून आले आहेत. या विजयांमुळे शिंदे गटाची जिल्ह्यातील राजकीय पकड मजबूत झाल्याचे मानले जात आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) काही ठिकाणी सत्ताधारी (पान २ वर)

**निकालांच्या चित्राकडे पाहता भाजपने जिल्ह्यात चांगली कामगिरी केल्याचे दिसून आले आहे. जामनेरसह रावेर, सावदा, फैजपूर, एरंडोल, चाळीसगाव, शेंदुर्णी आणि नशिराबाद या आठ नगर परिषदांमध्ये भाजपचे नगराध्यक्ष निवडून आले आहेत. विशेषतः ग्रामीण व निमशहरी भागात भाजपला संघटनात्मक ताकदीचा फायदा झाल्याचे राजकीय निरीक्षकांचे मत आहे.**

### मातब्बर निष्प्रभ ठरले

जळगाव जिल्ह्यात राष्ट्रवादीच्या अजित पवार गटात विधानसभेच्या निवडणुकीनंतर अनेक मातब्बरांचे प्रवेश झाले आहेत. ज्यामध्ये विधानसभेचे माजी अध्यक्ष अरूण गुजराथी, माजी मंत्री डॉ. सतीश पाटील, गुलाबराव देवकर तसेच माजी आमदार कैलास पाटील, दिलीप सोनवणे, लोकसंघर्ष मोर्चाच्या प्रतिभा शिंदे आदींचा समावेश आहे. तसेच अमळनेरमध्ये पक्षाचे आमदार अनिल पाटील आहेत. संबंधित सर्वांमुळे जिल्ह्यात अजित पवार गटाची मोठी ताकद वाढल्याचे बोलले जाते. परंतु, जिल्ह्यातील नगर परिषदांच्या निवडणुकीत कुठेच अजित पवार गटाचा नगराध्यक्ष निवडून आला नाही. तुलनेत राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाने तरी भुसावळमध्ये प्रतिकूल परिस्थितीत आपला झेंडा रोवून दाखवला. त्यामुळे अजित पवार गटावर आता आत्मचिंतन करण्याची वेळ आली आहे.

# सत्ताधारी पक्षांचा विजय निवडणूक आयोगाच्या आशीर्वादाने

वृत्तसंस्था । मुंबई



## • काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचा आरोप

**नगरपालिका, नगरपंचायत निवडणुकांमध्ये निवडणूक आयोगाचा गलथान कारभार अधिरेखित झाला आहे. मतदान प्रक्रियेचा पुरता गोंधळ घातला गेला, तारीख पे तारीखचा खेळ केला. ही निवडणूक मुक्त आणि निरपेक्ष पद्धतीने अशी झाली नाही. निवडणुकीतील सत्ताधारी पक्षांचा विजय हा निवडणूक आयोगाच्या आशीर्वादानेच झाला असल्याचा आरोप काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला.**

सत्ताधारी पक्षाकडून साम, दाम, दंड, भेद या नीतीचा मुक्तपणे वापर करण्यात आला. निवडणुकीत बोगस मतदार, दडपशाही, सत्तेचा गैरवापर आणि पैशाचा प्रचंड वापर पहायला मिळाला. सत्ताधारी पक्षांच्या विजयात निवडणूक आयोगाची मदत सर्वात महत्वाची ठरली आहे, असे ते म्हणाले. भाजपा महायुती सरकारच्या कामावर जनता प्रचंड नाराज आहे. भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात बोकाळला आहे, जनतेची कामे होत नाहीत, अशा परिस्थितीत आज आलेले निकाल जनतेचा कौल वाटत नाही. लोकशाही व संविधानाची पायमल्ली करत खुलेआमपणे दडपशाही करण्यात आली.

निवडणूक आयोग सत्ताधाऱ्यांच्या हातचे बाहुले बनले आहे. निवडणूक आयोगाचा गोंधळी कारभार व सत्ताधारी पक्षांचा पैसा फेक तमाशा देख, हा खेळ या निवडणुकीत पहायला मिळाला. या सर्व पार्श्वभूमीमुळे काँग्रेस पक्षाला अपेक्षित यश मिळालेले नाही. काँग्रेसला अपेक्षित यश मिळाले नसले तरी काँग्रेस पक्ष लोकशाही व संविधान रक्षणासाठी संघर्ष करत राहील, आमची ही वैचारिक लढाई आहे (पान २ वर)

# घराणेशाहीला मतदारराजाने शिकवला चांगलाच धडा

वृत्तसंस्था । मुंबई

**राज्यातील नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकीत भाजपने जोरदार मुसंडी मारत वर्चस्व कायम राखले आहे. मात्र, या निवडणुकीत मतदारांनी घराणेशाही राबवणाऱ्या उमेदवारांना मोठा धडा शिकवला आहे.**

अनेक नेत्यांनी कुटुंबीयांना उमेदवारी दिली होती, पण जनतेने ती स्पष्टपणे नाकारली. तब्बल २९ नेत्यांच्या नातेवाइकांना पराभवाची नामुष्की ओढवली असून, 'कही खुशी, कही गम' अशी स्थिती निर्माण झाली आहे. राज्यात आमदारकी-खासदारकीसह स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये एकाच कुटुंबाचे वर्चस्व असते. यावेळी मंत्र्यांच्या पत्नी, मुली, सून, भाऊ, मुलगा अशा नातेवाइकांना उमेदवारीची 'खैरात' वाटली गेली. मात्र, मतदारराजाने घराणेशाहीला ठोस सुरुंग लावला आहे.

# ऑनलाइन फसवणुकीचा धक्का : पंजाबचे माजी आयजी अमरसिंह चहल यांचा आत्महत्येचा प्रयत्न

वृत्तसंस्था । पटियाला

**पंजाब पोलीस दलातील माजी आयपीएस अधिकारी आणि निवृत्त महानिरीक्षक अमरसिंह चहल यांनी सोमवारी राहत्या घरी स्वतःवर गोळी झाडून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. या घटनेमुळे संपूर्ण पंजाबमध्ये खळबळ उडाली असून, यामागे मोठे आर्थिक नुकसान आणि ऑनलाइन फसवणूक कारणीभूत असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे.**



मिळालेल्या माहितीनुसार, सोमवारी पटियाला येथील आपल्या निवासस्थानी अमर सिंह चहल यांनी स्वतःवर गोळी झाडली. गोळीबाराचा आवाज ऐकताच कुटुंबीयांनी धाव घेतली आणि त्यांना रक्ताच्या थारोळ्यात पाहिले. त्यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सध्या त्यांची प्रकृती अत्यंत गंभीर असून डॉक्टर त्यांच्यावर उपचार करत आहेत.

**सुसाईड नोटमध्ये धक्कादायक खुलासा**

घटनेची माहिती मिळताच पटियालाचे वरिष्ठ पोलीस अधीक्षक वरुण शर्मा यांनी पथकासह घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी घटनास्थळावरून एक चिठ्ठी (सुसाईड नोट) हस्तगत केली (पान २ वर)

# स्टेट बँकेच्या अहिल्यानगर मुख्य शाखेत ३.७७ कोटींचा अपहार




## • बँक अधिकारी, पत्नी व मेहुण्याविरुद्ध गुन्हा

वृत्तसंस्था । अहिल्यानगर

**शहरातील स्टेट बँक ऑफ इंडियाच्या मुख्य शाखेत ३ कोटी ७७ लाख १ हजार ६१९ रूपयांचा अपहार केल्याच्या आरोपावरून भिंगार कॅम्प पोलिसांनी बँकेतीलच अधिकारी, त्याची पत्नी व मेव्हणा या तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. बँकेच्या मुख्य शाखेतील शाखाप्रमुख भूमिजा साकेत रावत यांनी यासंदर्भात पोलिसांकडे फिर्याद दाखल केली आहे. गुन्हा दाखल झालेला अधिकारी सीनियर असोसिएट या पदावर काम करत होता.**

शाखाप्रमुख भूमिजा रावत यांना स्टेट बँकेच्या मुख्य शाखेतील असामान्य आर्थिक व्यवहार तपासणी संगणक प्रणालीमध्ये मे २०२५ मध्ये संशयास्पद व्यवहार आढळून आले. तपासादरम्यान सीनियर असोसिएट या पदावरील अधिकारी या व्यवहारांशी संबंधित असल्याचे निदर्शनास आले. तो सन २००९ ते २०१८ आणि पुन्हा १ जून २०२१ ते १३ मे २०२५ या कालावधीत मुदतठेव व गुंतवणूक विभागात सिनियर असोशिएट म्हणून कार्यरत होता. या विभागात ग्राहकांच्या मुदतठेवी स्वीकारणे, गुंतवणूक योजनांचे व्यवहार, मुदतपूर्ती झालेल्या ठेवी परत देणे व त्यांची संगणकीय नोंद ठेवण्याची जबाबदारी संबंधित कर्मचाऱ्यावर असते. आरोपी अधिकाऱ्याने प्रबंधक या (पान २ वर)

# राज्यात प्राथमिक, रुग्णालय सेवांसाठी स्वतंत्र आरोग्य संचालक!

## • या बदलामुळे रुग्णांना अधिक वेगवान व दर्जेदार सेवांची अपेक्षा

वृत्तसंस्था । मुंबई

**राज्यातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्था अधिक परिणामकारक, प्रवाही आणि जनतेकेंद्री करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. आतापर्यंत मुंबई-पुणे अशी भौगोलिक विभागणी असलेल्या आरोग्य सेवा संचालक पदांची रचना बदलून आता सेवांच्या स्वरूपानुसार (कार्यात्मक पद्धतीने) विभागणी करण्यात आली आहे.**

यानुसार आरोग्य संचालक मुंबई हे पद आता संचालक (रुग्णालय) तर आरोग्य संचालक पुणे हे पद संचालक (प्राथमिक आरोग्य सेवा) म्हणून



कार्यरत राहणार आहे. या बदलामुळे धोरणात्मक निर्णय थेट सेवा पुरवठ्याशी जोडले जाणार असून रुग्णांना अधिक वेगवान व दर्जेदार आरोग्य सेवा मिळण्याची अपेक्षा आरोग्य सचिव पातळीवर व्यक्त केली जात असली तरी या निर्णयामुळे आरोग्य विभागाच्या डॉक्टरांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. मुळातच आरोग्य विभागाचा कारभार तसेच निर्णय प्रक्रियेत डॉक्टरांना फारसे स्थान राहिलेले नाही. दोन आरोग्य सचिव, तसेच दोनचार आयएएस अधिकारी आणि आरोग्य आयुक्त यांच्या माध्यमातून आरोग्य विभागाचे सर्व प्रमुख निर्णय घेतले जातात. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तसेच अर्थमंत्र्यांकडे आरोग्य अर्थसंकल्पावर होणाऱ्या बैठकांमध्येही आरोग्य संचालक व काही वरिष्ठ डॉक्टर केवळ उपस्थित असतात. निर्णय प्रक्रिया ही पूर्णतः बाबू मंडळींच्या हातात गेली असल्याचे आरोग्य विभागाच्या वरिष्ठ डॉक्टरांचे म्हणणे आहे.

गंभीरबाब म्हणजे आरोग्यमंत्री प्रकाश आबीटकर यांचीही परिस्थिती अवघडल्यासारखीच असल्याचे डॉक्टरांचे म्हणणे आहे. औषध खरेदी (पान २ वर)

**• आरोग्य विभागाच्या सर्व रुग्णालयात मिळून बाह्य रुग्ण विभागात सुमारे सव्वातीन कोटी रुग्णांवर उपचार केले जातात. सुमारे २२ लाख रुग्ण वर्षभरात दाखल होतात तर छोट्या व मोठ्या मिळून सुमारे पाच लाख शस्त्रक्रिया आरोग्य विभागाच्या रुग्णालयात केल्या जातात. या सर्वांवर थेट आरोग्य संचालकांचे नियंत्रण असेल तरच प्राथमिक आरोग्य केंद्रांपासून जिल्हारुग्णालयांपर्यंतचे योग्य नियोजन करता येईल असे डॉक्टरांचे म्हणणे आहे.**

## थोडक्यात

### माजी विद्यार्थ्यांकडून शाळेला टीव्ही भेट



**जळगाव ।** मेहरुण परिसरातील श्री संत ज्ञानेश्वर प्राथमिक व माध्यमिक विद्यालयाला शाळेच्या माजी विद्यार्थ्यांकडून टीव्ही संच भेट देण्यात आले. माजी विद्यार्थी उत्कर्षा सपके, उर्वशी सपके, लीना माळी, पायल सोनगिरे, तेजश्री माळी, ऋतिका कासार, पल्लवी महाजन, भावेश पालवे, लकी सपके, श्याम चव्हाण, सुमित दुसाने, कार्तिक इंगळे, लोकेश वाघ, भाग्यश्री मिस्त्री, ऋतुजा वाणी यांनी यांच्या सहभागातून शाळेला दोन टीव्ही संच देण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक मुकेश नाईक यांनी माजी विद्यार्थ्यांचे आभार मानले. तसेच, अशा उपयुक्त भेटींमुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला हातभार लागतो, असे मत व्यक्त केले.

### संवेदिकरण कार्यशाळेचे २९ रोजी आयोजन

**जळगाव ।** के.सी.ई सोसायटी संचलित शिक्षणशास्त्र आणि शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालयात सोमवार, दि. २९ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत संवेदिकरण या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्या भविष्यातील नोकरीच्या अनुषंगाने आवश्यक कौशल्ये या कार्यशाळेत समविष्ट केलेली आहेत. कार्यशाळेला प्राचार्य डॉ.अशोक राणे, अधिष्ठाता डॉ. साहेबराव भूकन, प्रा.सुलेखा पालवे मादाम, उपप्राचार्य डॉ. केतन चौधरी उपस्थित राहणार आहेत. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयमधील सर्व विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा खुली असून लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# वैज्ञानिक दृष्टिकोनासह, रोगमुक्त रोपांना प्राधान्य द्यावे : डॉ.अशोक धवन

## ● जैन हिल्स येथे राष्ट्रीय सिट्रस सिम्पोजियम-२०२५ तांत्रिक सादरीकरण

**प्रतिनिधी । जळगाव**

जागतिक मानांकन असलेल्या बंदिस्त वातावरणात मातृवृक्षापासून तयार केलेल्या रोगमुक्त रोपांना प्राधान्य दिले पाहिजे. कारण रोप लागवड केल्यानंतर पहिल्या वर्षी ते चांगले दिसत असले तरी पुढील पाच वर्षानंतर त्यावर वेगवेगळे कीडरोगांचा प्रादुर्भाव दिसतो. काही ठिकाणी तर ती फुलारा सुद्धा धरत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांची फसगत होऊन पाच वर्ष सांभाळल्यानंतर ती फळबाग काढून टाकणे कठिण होऊन जाते. असे असताना वैज्ञानिक दृष्टिकोन परिषदेच्या माध्यमातून संशोधकांनी दिला जात आहे. गेल्या दशकांमध्ये जैन स्वीट ऑरेंजच्या माध्यमातून जैन इरिगेशनसारखी खासगी संस्था



प्रभावी संशोधन करीत आहे ते शेतकऱ्यांसाठी मौलीक अशी गोष्ट आहे. असे सांगत कृषी विज्ञान केंद्र, कृषी विद्यापीठ व संस्थांनी पुढाकार घेऊन शेतकऱ्यांना चांगल्यात चांगली रोपे उपलब्ध करुन द्यावी, असे मत परभणी मराठवाडा कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ.अशोक धवन यांनी व्यक्त केले.

देशातील लिंबूवर्गीय फळ (संत्री, मोसंबी, लिंबू) उत्पादनाला नवी दिशा देण्यासाठी इंडियन सोसायटी ऑफ सिट्रीकल्चर आणि जैन इरिगेशन सिस्टिम्स लि. यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सिट्रस सिम्पोजियम-२०२५ तांत्रिक सादरीकरणाच्यावेळी ते बोलत होते.

बडिहांडा सभागृह आणि परिश्रम सभागृहात 'तांत्रिक सत्र' संपन्न झाले. याच परिषदेचा एक भाग म्हणून जैन संशोधन प्रात्यक्षिक केंद्रातील जैन स्वीट ऑरेंजच्या मातृवृक्ष ग्रीन हाऊस, मोसंबी लागवड क्षेत्र तसेच फळ प्रक्रिया उद्योग यासह क्लायमेंट स्मार्ट टेक्नॉलॉजीची प्रात्यक्षिके सर्व अभ्यासकांनी अनुभवली. त्यात लिंबूवर्गीय फळांचे उत्पादन वाढविण्यासाठी करावयाच्या बाबींवरील संशोधन पेपर्स सादर करण्यात आले.

डॉ.येलेश कुमार यांनी उत्पादन वाढीसाठी रोपांची गुणवत्ता यावर सादरीकरण केले. नागपूरचे डी.टी. मेश्राम यांनी पिक निहाय पाण्याचे नियोजन, सेंन्सर सिस्टीम, सरफेस इरिगेशनसह ऑटोमेशनचा वापर यातून पिकांची वाढ, ताण, फुलोरा आणि फळांची गुणवत्ता यावर सादरीकरणातून भाष्य केले. जैन इरिगेशनचे एम.एस. लधानिया यांनी रूट एअर प्रुनिंग, क्लायमेंट चेंज टेक्नोलॉजीवर सादरीकरण केले. त्यात त्यांनी जैन स्वीट ऑरेंजच्या विविध वाणांची माहिती दिली. मल्लिकार्जून बिरादार यांनी जैव उत्तेजक आणि सुक्ष्मपोषक घटकांच्या वापरातून लिंबूवर्गीय फळधारणा सांगितले. जैन इरिगेशनचे जगदीश पाटील यांनी जैन स्वीट ऑरेंजची सेंद्रीय पद्धतीने लागवड, आकाश शर्मा यांनी गोड संत्र्यांसाठी अनावश्यक वाढ होणाऱ्या फांद्यांची छाटणीवर सांगितले. लिंबूवर्गीय फळांच्या झाडांना ताणाखाली ठेवण्यासाठी मुळांच्या आकारात्मक पाण्याचे व्यवस्थापन यावर विश्वजित सिंग यांनी सादरीकरण केले. हायटेक ग्रीन हाऊस नर्सरी अंतर्गत लिंबूवर्गीय मायक्रोबडेड यावर जैन इरिगेशनचे डी.जी.पाटील यांनी वस्तूनिष्ठ सादरीकरण केले.

# विद्यार्थी दशेत चांगल्या मित्रांची संगतच जीवन घडवते

## ● पो.नि. शशिकांत पाटील यांचे प्रतिपादन



**प्रतिनिधी । जळगाव**

**आपलं जीवन सुसंगत आनंदी करण्यासाठी विद्यार्थी जीवनातले मित्र कारणीभूत ठरत असतात. यासाठी विद्यार्थी, विद्यार्थिनींनी आपल्या आई वडिलांनी, शिक्षकांनी, ज्येष्ठांनी सांगितलेल्या, उपदेश केलेल्या गोष्टी ऐकल्या पाहिजेत. आपले मित्र, मैत्रिणी विचारी आणि जाणिवशील असले तर चांगले असे जीवन घडत जाते, असे विचार तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक शशिकांत पाटील यांनी व्यक्त केले.**

असोदा येथील सार्वजनिक विद्यालय येथे 'विद्यार्थ्यांच्या मनाची जनजागृती' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ शिक्षक पी.जी. कोल्हे हे होते. यावेळी एएसआय. सुनील पाटील, पोलीस हेड कॉन्स्टेबल प्रदीप राजपूत, पोलीस नाईक ज्ञानेश्वर कोळी, ज्येष्ठ शिक्षिका मंगला नारखेडे उपस्थित होते.

पुढे बोलताना पो.नि. शशिकांत पाटील यांनी, गुड टच, बॅड टच, आई-वडील, शिक्षक यांचे आपल्या जीवनातील महत्व तसेच विद्यार्थी सुरक्षिततेसाठी पोलीस हेल्पलाइन क्रमांक यासह विविध विषयांवर मार्गदर्शन केले.

सूत्रसंचालन सचिन जंगले यांनी केले तर आभार एल.जे. भुगवड्या यांनी मानले.

# विद्यापीठाचा आज दीक्षांत समारंभ

**प्रतिनिधी । जळगाव**

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा ३४ वा दीक्षांत समारंभ आज (दि.२३) सकाळी १० वाजता विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहात आयोजित करण्यात आला असून या समारंभासाठी २९ हजार ९७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे.**

दीक्षांत समारंभाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु प्रा. व्ही. एल. माहेश्वरी राहणार असून बंगळूरु येथील राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषदचे संचालक प्रा.गणेशन कन्नबीरन यांचे दीक्षांत भाषण होणार आहे. या समारंभासाठी २९ हजार ९७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. यात विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे १२,२५९, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे ४,५९९, मानवविज्ञान विद्याशाखेचे ६,४१९ आणि आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेच्या २,२६० स्नातकांचा समावेश आहे. यात शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाचे २८७, मु.जे. महाविद्यालयाचे १२७१, प्रताप महाविद्यालयाचे ८५२, जी.एच.रायसोनी इन्स्टीट्युट ऑफ बिझीनेस मॅनेजमेंटचे ९६३ व आर.सी. पटेल इन्स्टिटयुट ऑफ फार्मास्युटीकल एज्युकेशन अ‍ॅण्ड रिसर्चचे १८७ अशा ३,५६० विद्यार्थ्यांना पदवी बहाल केली जाणार आहे. गुणवत्ता यादीतील १२० विद्यार्थ्यांना या समारंभात सुवर्णपदक दिले जाणार आहे. या मध्ये ८८ मुले व ३२ मुलींचा समावेश आहे. १९५ पीएच. डी. धारक देखील पदवी घेणार आहेत.

# रायसोनी करंडक एकांकिका स्पर्धेत मू.जे. महाविद्यालयाची 'भोरपी' प्रथम

## ● १ ते ४ फेब्रुवारीदरम्यान रंगणार अंतिम फेरी; जळगाव, शहादा येथील ४ संघ होणार सहभागी

**प्रतिनिधी । जळगाव**

**जी.एच. रायसोनी स्पोर्ट्स अँड कल्चरल फाउंडेशनच्यावतीने आयोजित जी.एच. रायसोनी करंडक या राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेच्या प्राथमिक फेरीत मूळजी जेठा महाविद्यालयाच्या 'भोरपी' या एकांकिकेने प्रथम क्रमांक पटकावला.**

जी.एच. रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट येथे रविवार, दि.२१ रोजी या करंडक स्पर्धेची प्राथमिक फेरी पार पडली. स्पर्धेचे उद्घाटन



जी.एच. रायसोनी इन्स्टिट्यूटच्या संचालिका प्रा.डॉ. प्रिती अग्रवाल यांच्या हस्ते करण्यात आले. स्पर्धेचे परीक्षक म्हणून बालरंगभूमी परिषदेच्या जिल्हा शाखेचे अध्यक्ष योगेश शुक्ल उपस्थित होते. स्पर्धेकरीता जळगाव, धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील महाविद्यालयांकडून प्रवेशिका प्राप्त झाल्या होत्या. त्यापैकी मूळजी जेठा महाविद्यालय, नूतन मराठा महाविद्यालय, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट व शहादा येथील साने गुरुजी कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय या चार संघांची विभागीय अंतिम फेरीसाठी निवड करण्यात आली. तसेच मागील वर्षी राज्यस्तरीय अंतिम फेरीत तृतीय क्रमांक मिळवलेल्या डॉ.सुरेश पाटील महाविद्यालय, चोपडा यांच्या 'यात्रा' या एकांकिकेची थेट अंतिम फेरीसाठी निवड करण्यात आली.

**■ या महाविद्यालयांनी पटकावले क्रमांक...**

प्राथमिक फेरीत नूतन मराठा महाविद्यालयाच्या 'मारुतीची जत्रा' या एकांकिकेला द्वितीय तर कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंटच्या 'नो सिग्नल' या एकांकिकेला तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. शहादा (जि. नंदुरबार) येथील साने गुरुजी कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या 'मादी' या एकांकिकेला परीक्षक प्रशंसनीय पुरस्काराने गौरविण्यात आले.

## पान १ वरुन

### राज्यात विजेच्या धक्क्यामुळे......

एकूण २० कोटी ५४ लाख रुपयांची नुकसान भरपाई मृतांच्या कुटुंबीयांना देण्यात आली आहे. तसेच विद्युत निरीक्षकांना चौकशीदरम्यान साक्षीदारांना हजर राहण्यास सांगणे, आवश्यक कागदपत्रे मागवणे आणि पुरावे गोळा करण्यासाठी कोड ऑफ सिव्हिल प्रोसिजर १९०८ अंतर्गत सर्व कायदेशीर अधिकार असल्याचे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

### सत्ताधारी पक्षांचा विजय......

असे सपकाळ म्हणाले. तेच आकडे, त्याच मशीन आणि तीच सेटिंग  संजय राऊत - हे आकडे विधशनसभेसारखेच आहेत. तेच आकडे, त्याच मशीन आणि तीच सेटिंग. आकड्यांमध्ये कोणताही बदल झाला नाही. भाजपने मशीन विधानसभेसारख्याच सेट केल्या. त्यांनी निदान आकडे बदलण्याची गरज होती, अशी प्रतिक्रिया ठाकरे गटाचे नेते खासदार संजय राऊत यांनी केली. विधानसभेचे निकाल पाहिले असतील तर १२०-१२५ भाजपला, विधानसभेला व इथेही शिंदे गटाला ५४ चा आकडा आणि ४०-४२ अजित पवार गटाला. त्याच मशीन, तीच सेटिंग आणि तोच पैसा. ही आपली लोकशाही आहे, अशी टीका त्यांनी केली.

### जळगाव जिल्ह्यात राष्ट्रवादीचा......

महायुतीचा भाग असतानाही स्वतंत्र लढतीत फारसे यश मिळवू शकली नाही. मात्र, नशिराबादसह काही नगर परिषदांमधील प्रभागात मिळालेल्या यशामुळे भविष्यातील राजकीय रणनीतीसाठी पक्षाला आधार मिळाल्याचे सांगितले जात आहे. या निवडणुकांच्या निकालांमधून महायुती एकत्र असली तरी स्थानिक पातळीवर स्वतंत्र ताकद आजमावण्याची प्रवृत्ती स्पष्ट झाली आहे. आगामी जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हे निकाल महत्त्वाचे मानले जात आहेत.

### स्टेट बँकेच्या अहिल्यानगर......

नावाने असलेल्या २२ मुदतठेव पावत्या, जिल्हा ग्राहक मंच या नावाने असलेल्या ५३ मुदतठेव पावत्या बेकायदेशीरपणे बंद केल्या. त्या ठेवींमधील रक्कम स्वतःच्या फायद्यासाठी वळवल्याचे अंतर्गत तपासात निष्पन्न झाले. मेव्हण्याच्या खात्याशी अधिकाऱ्याचा मोबाईल नंबर लिंक असल्याचेही तपासात आढळले. अधिकाऱ्याने बनावट बँकर्स चेकचा वापर केला, तसेच खोटी व बनावट कागदपत्रे तयार केली, संगणकीय रेकॉर्डमध्ये फेरफार केला, बँकर्स चेक बेकायदेशीररीत्या तयार केले, वरिष्ठ अधिकाऱ्यांची दिशाभूल करून व्यवहार मंजूर करून घेण्यासाठी इंटरनेट बँकिंग व यूपीआय सुविधेचा गैरवापर केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.अधिकाऱ्याने सन २००९ ते २०१८ व २०२१ ते २०२५ या कालावधीत बँकेचा कर्मचारी म्हणून मिळालेल्या अधिकारांचा गैरवापर करून, नातेवाईकांशी संगनमत करून सरकारी बँकेच्या निधीचा ३.७७ कोटी रूपयांचा अपहार केल्याचा ठपका संशयित आरोपींवर ठेवण्यात आला आहे. आरोपींविरोधात फसवणूक, विश्वासघात, बनावट कागदपत्रे तयार करणे आदी कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

### राज्यात प्राथमिक, रुग्णालय......

महामंडळावर सनदी अधिकारी, एड्स नियंत्रण विभागात सनदी अधिकारी, महात्मा फुले जनआरोग्य योजनेवर सनदी अधिकारी तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियानवर आरोग्य आयुक्त असे सनदी अधिकारी आरोग्य विभागात येऊनही ना मेळघाट मधील कुपोषणाचा प्रश्न सुटला ना आरोग्य विभागातील रुग्णालयांमध्ये औषधे वेळेवर उपलब्ध होतात. प्राथमिक आरोग्य केंद्रांपासून जिल्हा रुग्णालयांपर्यंत पुरेसे डॉक्टर का नाहीत तसेच विशेषज्ञ डॉक्टरांची पदे मोठ्या प्रमाणात का रिक्त आहेत याबाबत आरोग्य सचिव जबाबदारी घेतील का, असे सवालही डॉक्टरांकडून उपस्थित केला जात आहे.

### ऑनलाइन फसवणुकीचा धक्का......

आहे. या नोटमध्ये चहल यांनी ऑनलाइन आर्थिक फसवणूक झाल्याचा उल्लेख केला आहे. या फसवणुकीमुळे त्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून, त्यातून आलेल्या मानसिक तणावामुळे आपण हे टोकाचे पाऊल उचलत असल्याचे त्यांनी चिठ्ठीत नमूद केले आहे. निवृत्त आयजी अमरसिंह चहल हे गेल्या काही काळापासून चर्चेत होते. २०१५ मधील बहुचर्चित बेहबल कलान आणि कोटकपूरा गोळीबार प्रकरणी त्यांच्यावर आरोप होते. २०२३ मध्ये पंजाब पोलिसांच्या विशेष तपास पथकाने याप्रकरणी दाखल केलेल्या आरोपपत्रात चहल यांच्या नावाचा समावेश होता. या प्रकरणाचा तपास एडीजीपी एल.के. यादव यांच्या नेतृत्वाखाली सुरू आहे. 'आम्ही घटनास्थळावरून पुरावे गोळा केले असून सुसाईड नोटची सत्यता पडताळली जात आहे. ऑनलाइन फसवणुकीचे स्वरूप नेमके काय होते आणि त्यात कोणाचा सहभाग आहे, याचा सखोल तपास सायबर सेलच्या मदतीने केला जात आहे, अशी माहिती पोलीस प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

# भगीरथ शाळेत आयोजित नृत्याविष्कारात श्रोते मंत्रमुग्ध

## ● कलाकारांनी घडविले भारतीय संस्कृतीचे दर्शन

**प्रतिनिधी । जळगाव**

**येथील कै.सुनिता जगन्नाथ वाणी भगीरथ शाळेत सांस्कृतिक कार्यक्रम 'आनंदोत्सव-२०२५' उत्साहात पार पडला. यात कलाकारांनी पंजाबी, कोळी, कथ्थक, घुमर, भारुड, महाकाली अशी एकाहून एक सरस १४ धम्माल व भारतीय संस्कृतीचे दर्शन घडवणारी बहारदार नृत्य सादर केली. सर्वच कलाकारांच्या दमदार नृत्यविष्काराने प्रेक्षकांची मने जिंकली.**

कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्याहस्ते दीपप्रज्वलन व सरस्वती पूजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे माजी अध्यक्ष मेजर नाना वाणी हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे विद्यमान अध्यक्ष प्रमोद चांदसरकर, उपाध्यक्षा सीमा चांदसरकर, शालेय समिती अध्यक्षा सुप्रिया चांदसरकर, संस्थेचे सचिव राजेंद्र वाणी, संचालक निलेश भांडारकर, कलाशिक्षक एस.डी. भिरुड, मुख्याध्यापक एस.पी. निकम, उपमुख्याध्यापक जे.एस. चौधरी, पर्यवेक्षक के.आर. पाटील उपस्थित होते.

सर्व कलाकारांना कोरिओग्राफर लक्ष्मीकांत सपकाळे आणि सांस्कृतिक समिती प्रमुख संगीत शिक्षक राजू क्षीरसागर यांचे मार्गदर्शन लाभले. प्रास्ताविक मुख्याध्यापक एस.पी. निकम यांनी तर सूत्रसंचालन डॉ. अशोक पारधे यांनी केले. आभार डॉ.आर.डी.कोळी यांनी मानले. यावेळी विद्यार्थ्यांसह पालक मोठया संख्येने उपस्थित होते.



**■ ३०० विद्यार्थ्यांनी घेतला सहभाग...**

कार्यक्रमात श्रीगणेश वंदना, तारक मेहता का उल्टा चश्मा, स्कूल चले हम, कोळी गीत, वाघ्या मुरळी-गोंधळ, पंजाबी नृत्य, कथ्थक नृत्य, जय शिवराय, राजस्थानी घुमर, डान्स धमाका, नटरंग, महाकाली, भारुड, वंदे मातरम आदी गाण्यांवर नृत्य सादर करण्यात आले. यात रसिक अक्षरशः मंत्रमुग्ध झाले होते. इयत्ता पाचवी ते दहावीच्या ३०० विद्यार्थी कलाकारांनी सहभाग नोंदवला. त्यांना १५ हजार रुपयांची रोख बक्षीसे मिळाली.

# रोटरीतर्फे पोलिसांची आरोग्य तपासणी

**प्रतिनिधी । जळगाव**

रोटरी क्लब ऑफ जळगाव वेस्टतर्फे रामानंदनगर पोलीस स्टेशन येथे पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. शिबिरात डॉ.स्वप्निल चौधरी, डॉ.तेजस राणे, डॉ.नेहा भंगाळे यांनी तपासणी करुन मार्गदर्शन केले. रोटरी वेस्टचे मेडिकल कमिटी चेअरमन अमित चांदीवाल आणि रामानंदनगर पोलीस स्टेशनचे पोलीस नाईक राहुल चौधरी यांनी शिबिराचे नियोजन केले. यावेळी पोलीस निरीक्षक राजेंद्र गुंजाळ, एपीआय संदीप पाटील, रोटरी वेस्टचे अध्यक्ष गौरव सफळे, प्रकल्प सचिव देवेश कोठारी, प्रशासकीय सचिव महेश सोनी, योगेश राका, निखिल बियाणी, बिपिन काबरा उपस्थित होते.

# थायलंड येथील १२० बौद्ध भिक्खुनी जळगावात येणार

## ● भिक्खूनी अय्या वेदिसा यांची माहिती; अजिंठा हौसिंग सोसायटीमध्ये होणार धम्मदेसना

**प्रतिनिधी । जळगाव**

**थायलंड येथील बुद्ध चतु परिसा भिक्खूनी संघातर्फे भारतात महिलांमध्ये बौद्ध परंपरा विषयी प्रबोधन करणे, अधिकाधिक महिलांना भिक्खूनी बनविणे, भिक्खूनी निवास केंद्र उभारणे अशा विविध उपक्रमास गतिमान करण्याकरिता सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून दि.४ जानेवारी २०२६ रोजी थायलंड येथील १२० बौद्ध भिक्खुनी जळगाव**



**येथे येत आहेत, अशी माहिती जळगाव येथील भिक्खूनी अय्या वेदिसा यांनी दिली.**

अजिंठा हौसिंग सोसायटीतील जेतवन बुद्ध विहारात आयोजित बैठकीत त्यांनी ही माहिती दिली.

बैठकीत अधिक माहिती देतांना संघमित्रा चव्हाण यांनी सांगितले की, थायलंड येथील ९ भिक्खूनी त्यांच्या भारतीय सहकारीनिंसह जळगाव येथे येणार आहेत. त्या सर्वप्रथम अजिंठा सोसायटीत चारिका करणार व त्यानंतर उपस्थित जनतेस धम्मदेसना देतील, असे सांगितले.

कार्यक्रमाची आखणी चेतन नन्नवरे यांनी मांडली. या समारंभात जळगाव शहरातील बौद्ध महिलांना अधिक संख्येने सहभागी करून घेण्याकरिता करावयाच्या कामांची माहिती सांगितली. जेष्ठ साहित्यिक जयसिंग वाघ यांनी, येवढ्या मोठ्या संख्येने बौद्ध भिक्खूनी जळगाव शहरात येणे ही एक ऐतिहासिक बाब आहे. बौद्ध धर्माच्या प्रचारार्थ स्वतंत्र भिक्खूनी संघ आंतरराष्ट्रीय पातळीवर काम करीत आहे ही महिलांच्या स्वातंत्र्याच्या दृष्टीने गौरवास्पद बाब आहे, असे सांगितले.

कार्यक्रमाच्या नियोजनाकरिता अ‍ॅड.आनंद कोचुरे, दिलीप सपकाळे, प्रियंका सपकाळे, गीता सोनवणे, ज्योती भालेराव यांनी विविध प्रकारच्या सूचना करून मार्गदर्शन केले. प्रास्ताविक नूतन तासाखेडकर यांनी तर परिचय कविता सपकाळे करुन दिला. सूत्रसंचालन निलेश सैंदाणे यांनी केले. आभार हर्षल सुरडकर यांनी मानले.

बैठकीला प्रवीण नन्नवरे, दिलीप तासखेडकर, सतीश सोनवणे, विजय भालेराव, विजय सैंदाणे, रामकृष्ण सावळे, वर्षा कोचुरे, आशा सपकाळे, सुनंदा सैंदाणे, सुमन बैसाने, विमल भालेराव, पूजा कोचुरे, रंजनी सैंदाणे यांच्यासह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक सागर काशिनाथ ओतारी व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई -१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✻ कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी (मोबा. - ७५८८८१३१३२) (✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) E-Mail : dainikshauryamarathi@gmail.com

# अंगणवाडीतील बालकांना सामूहिक पोषण आहार

## बोराडी ग्रामपंचायतीचा अभिनव उपक्रम; इतर गावांनीही अंमलबजावणी करावी : आशाताई रंधे

प्रतिनिधी । बोराडी

**मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत राबविण्यात आलेला हा उपक्रम केवळ पोषण आहारापुरता मर्यादित न राहता, बालकांचा शारीरिक, शैक्षणिक व मानसिक विकास साधणारा ठरला आहे. बोराडी ग्रामपंचायतीच्या या उपक्रमामुळे गावातील पालक, अंगणवाडी सेविका व नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत असून भविष्यात अशा उपक्रमांची सातत्याने इतर गावांनीही अंमलबजावणी करून पालकांमध्ये जनजागृती करण्याची गरज असल्याचे मत, किविप्र संस्थेच्या खजिनदार आशाताई रंधे यांनी केले.**



संत गाडगेबाबा पुण्यतिथीनिमित्त बोराडी येथे अंगणवाडीतील बालकांसाठी सामूहिक पोषण आहार वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश म्हणजे अंगणवाडीतील मुलांना सकस, सात्विक व पौष्टिक आहार मिळावा तसेच पालकांमध्ये पोषण आहाराबाबत जनजागृती निर्माण व्हावी हा होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महिला बाल विकास अधिकारी वैशाली निकम होत्या.

उदघाटन आशाताई रंधे व माजी जि.प. सदस्या सिमाताई रंधे, सरपंच सुखदेव भिल, उपसरपंच राहुल रंधे ग्रा.पं. सदस्या विद्या रंधे, हरी पावरा, सतिश पवार, मयुरी पवार, उर्मिला पावरा, निता पवारा, चंद्रसिंग पवार, बबन पाटील, अंगणवाडी पर्यवेक्षिका कांता पवार, निर्मला पावरा, शशांक रंधे, ग्रामपंचायत अधिकारी राजेंद्र साळुंखे यांच्या सह ग्रामस्थ, पालक व माता मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या उपक्रमांतर्गत प्रत्येक अंगणवाडी सेविकेला एक स्वतंत्र सात्विक व पौष्टिक आहाराचे नियोजन करण्याची जबाबदारी देण्यात आली होती. यामध्ये पोहे, व्हेजिटेबल फ्लावर, उपमा, शिरा, दूध, लाडू, चिक्की, मटकी उसळ, केळी यांसारख्या विविध पौष्टिक व बालकांच्या आरोग्यास उपयुक्त अशा पदार्थांचा समावेश करण्यात आला. या आहारामुळे मुलांना आवश्यक ऊर्जा, पोषणमूल्ये व आरोग्यदायी सवयी लागण्यास मदत झाली.

यासाठी अंगणवाडी सेविका सुनिता सगरे, प्रतिभा कोळी, प्रतिभा पाटील, सुधाबाई सोनार, जयश्री देवरे, रंजना कोळी, कल्पना बडगुजर, लक्ष्मी मालचे, बडगुजर, प्रतिभा पाटील, आदींनी सहभाग घेतला होता. पोषण आहारासोबतच बालकांच्या शैक्षणिक विकासालाही तितकेच महत्त्व देण्यात आले. यावेळी प्रमोद भामरे या जादूगाराने जादूचे खेळ तसेच गाण्यांचे खेळ सादर करून मुलांचे मन जिंकले. हा स्तुत्य या नाविन्यपूर्ण उपक्रमासाठी धुळे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अजिज शेख, उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्नेहा पवार, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा नोडल अधिकारी स्वरांजली पिंगळे, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. तुषार रंधे यांचे मार्गदर्शन लाभले. उपक्रमासासाठी ग्रामपंचायत अधिकारी राजेंद्र साळुंखे, गजू पाटील, अंबादास सगरे, गणेश भामरे, चंद्रकांत बडगुजर, भूषण कुलकर्णी, मुकेश जाधव, उमेश पावरा, बादल पावरा, विजय पावरा तसेच सर्व ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले.

**ग्रामपंचायतीच्या वतीने प्रत्येक विद्यार्थ्याला पाट्या व आवश्यक शैक्षणिक साहित्य वितरित करण्यात आले. यामुळे मुलांमध्ये शिक्षणाबाबतचा उत्साह वाढला असून नियमित शाळा व अंगणवाडीकडे येण्याचा कल अधिक बळकट झाला आहे. सध्याच्या आधुनिक जीवनशैलीमध्ये मुलांच्या आहाराकडे पालकांचे पुरेसे लक्ष दिले जात नसल्याचे चित्र अनेक ठिकाणी दिसून येते. याच पार्श्वभूमीवर, अंगणवाडीच्या माध्यमातून मुलांना योग्य पोषण आहार कसा देता येईल, यासाठी बोराडी ग्रामपंचायतीने पुढाकार घेत दहा अंगणवाड्यांचा संयुक्त पोषण आहार कार्यक्रम आयोजित केला होता. त्यासोबत आज संत गाडगेबाबा पुण्यतिथीनिमित्ते बोराडी गावात असलेल्या गाडगेबाबा मंदिरात ग्रामपंचायतीच्या वतीने पूजन करण्यात आले व सफाई कर्मचाऱ्यांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रम अधिक आनंददायी व स्मरणीय व्हावा यासाठी मुलांच्या मनोरंजनाचाही समावेश करण्यात आला.**

## थोडक्यात

### मनपा जनगणना कक्षाचे उद्घाटन नगणना

**धुळे ।** केंद्र शासनाने सन २०२७ मध्ये देशाची जनगणना करण्याचा निर्णय घेतला असून महाराष्ट्र जनगणना कार्य निर्देशालयाचे संचालकांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या व्हिडीओ कॉन्फरन्स मध्ये जनगणना २०२७ बाबत मार्गदर्शक सुचना दिलेल्या आहेत. त्यादृष्टीने आयुक्त तथा प्रशासक नितीन कापडणीस यांच्या आदेशाने व मार्गदर्शनाखाली जनगणना कक्षाची निर्मिती करण्यात आली आहे. या प्रक्रियेत प्रगणक नियुक्ती, सर्वेक्षक नियुक्ती, प्रशिक्षण इत्यादी बाबत प्राथमिक तयारी सुरु करण्यात आलेली आहे.

### ब्राह्मण समाजाचे निवेदन

**शिरपूर ।** आय.ए.एस. अधिकारी संतोष वर्मा यांना बडतर्फ करून कारवाई करावी, अशी मागणी राजस्थानी गौड़ ब्राह्मण समाजातर्फे करण्यात आली आहे. याबाबत शिरपूर तहसीलदारांना निवेदन देण्यात आले. त्यात म्हटले आहे की, एक उच्च पदस्थ अधिकारी जो संपूर्ण जिल्हा सांभाळताना त्या जिल्ह्यातील सर्व जाती, धर्म, पंथ यांना सांभाळून घेऊन काम करणारा असावा व तठस्थपणे न्याय देणारा असावा, असे अभिप्रेत असताना एका कार्यक्रमामध्ये वर्मा यांच्या मनात असणारा ब्राह्मण द्वेष उफाळून आला, अशी व्यक्ती अशा पदावर लायक नाही. त्यांना कायमचे बडतर्फ करून कठोर कारवाई करावी. त्यामुळे पुन्हा कोणी असं कृत्य करणार नाही. यावेळी राजस्थानी गौड़ ब्राह्मण समाजाचे केतन पंडीत, बब्बू शर्मा, मनिष शर्मा, शुभम व्यास, सुशील तिवारी, जगदीश शर्मा, सागर कुलकर्णी,पदाधिकारी उपस्थित होते.

### नंदुरबार येथे सेवानिवृत्तांचा आज जिल्हा मेळावा

**नंदुरबार ।** नंदुरबार जिल्हा पेन्शनर असोसिएशनची वार्षिक सर्वसाधारण सभा दि. २३ डिसेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता गांधी नगरामधील पेन्शन भवनात आयोजित करण्यात आली आहे. या सभेत जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी जि.प. मुख्यकार्यकारी अधिकारी नमन गोयल, उपमुख्यकार्यकारी अधिकारी गणेश मोरे, जिल्हा कोषागार अधिकारी संजय खडसे, माजी प्राचार्य पी.एन. देशपांडे, माजी प्राचार्य बी.एस. पाटील, पेन्शन असोसिएशनचे माजी अध्यक्ष एन. डी. मारणे, वसंतराव बावळे, वासुदेश साठे व सरचिटणीस सुभाष पवार,विविध जिल्ह्याचे अध्यक्ष व पदाधिकारी उपस्थित राहणार आहे व सभेस मागदर्शन करणार आहेत. जिल्ह्यातील राज्य शासकीय व निमशासकीय कार्यालयांतील सेवानिवृत्त सदस्य यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन केले आहे.

# ११ के.व्ही. लाईनवर अडकलेल्या मोराचा लाईनमनांनी धाडसाने वाचवला जीव

प्रतिनिधी । साक्री

**तालुकक्यातील उंबट येथील शेतशिवारात ११ केव्ही कृषी पंपाच्या वीजवाहिनीवर अडकलेल्या राष्ट्रीय पक्षी मोराचा जीव धोक्यात आला असताना, येथील लाईनमनांनी जीवाची पर्वा न करता धाडसाने बचावकार्य करीत माणुसकीचे दर्शन घडवले.**



दि. १९ डिसेंबर रोजी रात्री सुमारे दहा वाजेच्या सुमारास शेतशिवारातील कृषी पंपाचा वीजपुरवठा अचानक खंडित झाला. त्यानंतर काही शेतकऱ्यांच्या लक्षात आले की, वीज खांबावर काहीतरी आवाज येत आहे. याची माहिती मिळताच पेट्रोलिंगवर असलेले लाईनमन मनोज पाटील व कैलास सूर्यवंशी हे घटनास्थळी पोहोचले. अंधारामुळे परिसरात अचूक परिस्थिती समजत नव्हती; मात्र पंखांच्या फडफडण्याचा आवाज सतत येत असल्याने संशय बळावला. टॉर्चच्या प्रकाशात खांबावर पाहणी केली असता एक मोर ११ केव्ही लाईनमध्ये अडकून तडफडत असल्याचे दिसून आले. उच्चदाब वीजवाहिनीमुळे कोणताही विलंब प्राणघातक ठरू शकत असल्याने तात्काळ वीजपुरवठा बंद करून लाईनमन कैलास सूर्यवंशी यांनी अंधारातच खांबावर चढून मोराला सुरक्षितरीत्या मोकळे केले. मोराला खाली उतरवल्यानंतर त्याला पाणी पाजण्यात आले. काही वेळातच मोर शुद्धीवर येऊन सावध झाला. त्यानंतर या मोरास पिंपळनेर येथील वनविभागाकडे सुपूर्त करण्यात आले. वनपाल चौरे यांनी मोराची वैद्यकीय तपासणी केली. तपासणीनंतर मोराची प्रकृती समाधानकारक असल्याचे निष्पन्न झाले. वनपरिक्षेत्राधिकारी ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली या राष्ट्रीय पक्ष्याला सुरक्षितपणे नैसर्गिक अधिवासात सोडण्यात आले. वीजपुरवठा सुरळीत करण्यासोबतच जीव वाचवण्याच्या उद्देशाने केलेल्या या धाडसी व संवेदनशील कार्याबद्दल संबंधित लाईनमनांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# नांद्रेतील आश्रमशाळेचा संघ विभागीय कबड्डी स्पर्धेत विजयी

प्रतिनिधी । धुळे



प्रतिनिधी नाशिक विभागीय कबड्डी क्रीडा स्पर्धेत एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प धुळे अंतर्गत असलेल्या नांद्रे (ता.धुळे) येथील आश्रमशाळेच्या १४ वर्षे वयोगटातून मुलांच्या संघाने विजय मिळविला. हा संघ राज्यस्तरावर नाशिक विभागाचे नेतृत्व करीत आहे. शासकीय अनुदानित आश्रमशाळा क्रीडा स्पर्धा नुकत्याच प्रकल्पस्तरावर झाल्या. त्यानंतर विजेता संघ विभागीयस्तरावर गेले. या स्पर्धा जळगाव येथील कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात १६ ते १८ डिसेंबर दरम्यान झाल्या. यात १४ वर्षे वयोगटातून मुलांच्या संघाने निर्विवाद विजय प्रस्थापित केला. नाद्रे आश्रमशाळेच्या खेळाडू विद्यार्थ्यांचा प्रथम पारितोषिक देऊन आदिवासी विकास विभागाचे अप्पर आयुक्त दिनकर पावरा यांनी गौरव केला. धुळे प्रकल्पाधिकारी प्रमोद पाटील, सहाय्यक प्रकल्पाधिकारी पवन सोनुने, मनोज पाटील, भटू आव्हाड, शिक्षण विस्ताराधिकारी सचिन चौधरी, अविनाश पाटील, सतीश काकड, संदीप पाटील, ज्योत्स्ना देवरे, क्रीडा समन्वयक विजय खैरनार, क्रीडा शिक्षक स्वप्निल पाटील आदी उपस्थित होते. विजय प्राप्त करणाऱ्या संघाचा सत्कार संस्थेतर्फे करून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या, संस्थेचे अध्यक्ष अनिल पाटील, माध्यमिक मुख्याध्यापक एस.टी. पाटील, प्राथमिक मुख्याध्यापक आर. एम.बोरसे, माजी जि.प. सदस्या रोहिणी पाटील, अतूल भामरे, स्वप्निल पाटील, शुभम पाटील, सायली पाटील, सचिन पाटील, काशिनाथ चौरे, योगेश भाबड, सचिन बेडसे, सुरेखा वसावे, मनोहर शिंदे, तुषार देवरे, उमेश हिरे, मिलिंद महिरे, जागृती भामरे, टी. एस. देवरे, गायत्री देसले, भटू पाटील, दिलीप पाटील, शिवदास ठाकरे, भूषण काकडे, चेतन पाटील व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कौतूक केले. राज्यस्तरीय स्पर्धा यवतमाळ येथे होणार आहेत.

### वाहनाला धडकल्याने एक जखमी

प्रतिनिधी । नंदुरबार

शहादा- शिरपूर रस्तयावर अंधाऱ्यात उभे असलेल्या वाहनाला दुचाकी धडकल्याने दुचाकीस्वार जखमी झाला असून वाहन चलाकाविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अशोक रामदास पाटील हे त्यांच्या ताब्यातील दुचाकीने शहादा शिरपूर रस्त्याने वडाळी येथे कामानिमित्त जात होते. याच रस्त्यावर सिमेंट मिक्सरचे वाहन (क्र.एम.एच.३९-ए.जे.९८७२) अंधाऱ्यात उभे वाहन चालक राजू भावराव कोळी अंधाऱ्यात उभे केल्यामुळे अशोक पाटील वाहनावर धडकले यामुळे त्यांच्या डोक्यावर व हातापायांना दुखापत झाली असून दुचाकीचे नुकसान झाले आहे.

# अखंड कीर्तन सप्ताहाचा समारोप

प्रतिनिधी । धुळे



तालुक्यातील सायने येथे सलग ३१ व्या वर्षी अखंड हरिनाम कीर्तन सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचा काल्याच्या कीर्तनाने समारोप झाला. समारोप सोहळ्याला भगवान महाराज सडगावकर यांचे काल्याचे कीर्तन झाले. यावेळी आ. राम भदाणे यांच्यासह मोठ्या प्रमाणात भाविकांची मांदियाळी होती. सायने येथे सलग एकतिसाव्या वर्षी अखंड हरिनाम कीर्तन सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा झाला. या सोहळ्यात किशोर महाराज सोनखेडीकर, जयपाल महाराज शेवाडेकर, स्वप्निल महाराज गिरडकर, रुपालीताई सवने परतुनकर, अनिल महाराज वसमानेकर, योगेश महाराज शिरपूरकर, नाना महाराज नवडाणेकर व भगवान महाराज सडगावकर यांची किर्तन सेवा झाली. किर्तन सोहळ्याच्या सातव्या दिवशी पालखी व भव्य मिरवणूक सोहळा झाला. आ. राम भदाणे सहभागी झाले. त्यांचा ग्रामस्थांकडून सत्कार झाला. आठव्या दिवशी काल्याचे कीर्तन झाले. त्यानंतर सायनेसह परिसरातील गावांसाठी महाप्रसादाचा कार्यक्रम झाला. निवृत्त मुख्याध्यापक व्ही. बी. पाटील यांनी महाप्रसादाचे संयोजन केले. सप्ताहाचे बुधा पाटील, रवींद्र पाटील, अधिकार पाटील, गजानन महाराज, सरपंच योगेश पाटील, विनोद पाटील, शामराव माळी, दगा पाटील, नंद सांगळे आदींनी संयोजन केले.

# केव्हीटी आरसीबीएस ई-स्कूलमध्ये कार्यक्रमांद्वारे प्रबोधन

प्रतिनिधी । बोराडी

**किसान विद्याप्रसारक संस्था संचलित कर्मवीर व्यंकटराव तानाजी रणधीर सीबीएस ई स्कूल शिरपूर येथे संत गाडगे महाराज पुण्यतिथीनिमित्त विद्यालय परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.**



यावेळी शाळेचे समन्वयक सागर वाघ यांनी प्रतिमा पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात केली. महेंद्र पानपाटील यांनी संत गाडगे महाराज हे गोरगरीब दीनदलित यांच्यातील अज्ञान, अंधश्रद्धा, अस्वच्छता यांचे उच्चाटन करण्यासाठी तळमळीने कार्य करणारे समाज सुधारक होते, असे सांगितले. शाळेतील संगीत विभागाचे कमलेश ईशी व राकेश बोरसे यांनी विद्यार्थ्यांकडून गाणे सादर केले. तसेच अनिल लुंगसे यांच्या मार्गदर्शनाखाली इयत्ता अकरावीच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर केले. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता नववीची विद्यार्थिनी श्रुतिका पाटील हीने केले, तसेच यावेळी कार्यक्रमाचे नियोजन हे शाळेतील सांस्कृतिक विभागाने केले. तसेच यावेळी शाळेतील राकेश बोरसे, कृष्णा अहिरे व प्रमुख शिक्षक शैक्षणिक विभागाचे समन्वयक उपस्थित होते. यावेळी शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

### नंदुरबार खोखो असो.चा संघ बीड येथे रवाना

प्रतिनिधी । नंदुरबार

बीड येथे होणाऱ्या ६१ वी पुरुष महिला राज्य अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धेसाठी नंदुरबार जिल्ह्याचा संघ सहभागी होणार आहे व सदर संघास नंदुरबार जिल्हा खो-खो असोसिएशनचे उपाध्यक्ष प्रा. संजय जाधव, महाराष्ट्र राज्य खो खो असोसिएशनचे सहसचिव डॉ. प्रा. राजेश सोनवणे यांनी दोघी संघांना शुभेच्छा दिल्या. पुरुष व महिला संघाचा चार दिवसीय सराव शिबीर शहादा येथील वसंतराव नाईक कॉलेजच्या मैदानावर राबवण्यात आला.

# डस्टबिनचा वापर करून गाव स्वच्छ ठेवा

## • सरपंच सीमा ठाकरे यांचे आवाहन; कर्ले येथे डस्टबिन वाटप शुभारंभ



प्रतिनिधी । दोंडाईचा

**गावातील गटारीमध्ये मोठ्या प्रमाणावर प्लास्टिक पिशव्या व कचरा टाकण्यात येतो तो एकाच ठिकाणी जमा व्हावा या उद्देशाने संपूर्ण गावाला मोफत डस्टबिन वाटप करण्याचा निर्णय घेतला असून याचा वापर करून गाव स्वच्छ ठेवावे असे आवाहन कर्ले गावाच्या सरपंच सिमा दिनेश ठाकरे यांनी केले.**

१५ वित्त आयोग ग्रामपंचायतस्तर निधीतून सरपंच सिमा दिनेश ठाकरे यांच्या संकल्पनेतून मोफत वाटप करण्याचा करण्यात आला.

यावेळी सरपंच सिमा ठाकरे, उपसरपंच पंडित वाघ, गटनेते माजी सरपंच दगाजी देवरे, नथ्थू डसबिन शुभारंभगोकुळ पवार, गोकुळ बेडसे, पोलिस पाटील प्रफुल्ल पाटील, दिनेश ठाकरे, ग्रा प सदस्य विठ्ठल चव्हाण, सोसायटी चे चेअरमन प्रविण सत्तर चव्हाण, विक्रम बेडसे, सुनिल चव्हाण, रावसाहेब शिंदे, किरण शिंदे, ज्ञानेश्वर चव्हाण, लिपिक सागर चव्हाण, ऑपरेटर अविनाश चव्हाण, शशिकांत चव्हाण, रतीलाल पगारे आदी मान्यवर उपस्थित होते कर्ले गावात एकूण ७६५ कुटूंब राहतात त्यांना दीपावली निमित्ताने मोफत पाण्याचा जार वाटप करण्यात आले होते आता मोफत डस्टबिन वाटप करण्यात येत असून सर्व ७६५ कुटुंबांना हा लाभ मिळणार आहे.



# अभिनव विद्यालयात क्रीडा सप्ताहाचे उद्घाटन

## विविध स्पर्धांमध्ये खेळाडूंनी नोंदविला सहभाग

प्रतिनिधी । जळगाव

**नंदुरबार । प्रतिनिधी येथील अभिनव विद्यालयात सन २०२५-२६ च्या क्रीडा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. या सप्ताहाचे उद्घाटन श्रॉफ हायस्कूलचे ज्येष्ठ क्रीडा शिक्षक राजेश शहा यांच्या हस्ते क्रीडा मशाल प्रज्वलनाने करण्यात आले.**



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अभिनव विद्यालयाचे मुख्याध्यापक तारकेश्वर पटेल होते. याप्रसंगी ज्येष्ठ शिक्षक हरिष जाधव, रत्ना चौधरी, वंदना पाटील आदी उपस्थित होते. तसेच राष्ट्रीय खेळाडू दक्ष चौधरी व लोकेश पाटील यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करीत क्रीडा मशाल प्रज्वलित करण्यात आली. यावेळी राजेश शहा यांनी विद्यार्थ्यांसोबत विविध फनी गेम्स खेळासंदर्भात संवाद साधला. खेळातून शिस्त, संघभावना, सकारात्मक स्पर्धा आणि आरोग्याचे महत्त्व याविषयी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. त्यांच्या सहभागामुळे विद्यार्थ्यांमध्ये विशेष उत्साह संचारला. अध्यक्षीय भाषणात मुख्याध्यापक तारकेश्वर पटेल यांनी विद्यार्थ्यांना शारीरिक सुदृढतेचे महत्त्व सांगत नियमित व्यायाम, खेळ व संतुलित आहार हे यशस्वी जीवनाचे आधारस्तंभ असल्याचे प्रतिपादन केले.

**खेळांमुळे व्यक्तीमत्त्व विकास होतो, असेही त्यांनी सांगितले. क्रीडा सप्ताहात १०० मीटर धावणे, लिंबू-चमचा शर्यत, स्लो सायकलिंग व पिरॅमिड गेम, बॅलेन्स गेम, संगीत खुर्ची आणि रस्सीखेच या फनी गेम्सच्या स्पर्धा पार पडल्या. विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून क्रीडा कौशल्याचे दर्शन घडविले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार रमेश मालखेडे यांनी केले. क्रीडा स्पर्धा यशस्वीतेसाठी विद्यालयातील शिक्षक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.**

# तापी नदीपात्रात अवैध वाळू उत्खनन

## • मुक्ताईनगर तहसीलदारांची कारवाई; वाळूमाफियांमध्ये खळबळ

प्रतिनिधी । मुक्ताईनगर

**तालुक्यातील अंतुर्ली परिसरात तापी नदी पात्रालगत सुरू असलेल्या अवैध रेती उत्खनन व वाहतुकीचा मोठा प्रकार तहसीलदार गिरीश वखारे यांच्या नेतृत्वाखालील महसूल पथकाने उघडकीस आणला आहे. या प्रकरणी ट्रॅक्टरचा अज्ञात चालक, मुकेश धनगर व संजय धनगर यांच्याविरोधात मुक्ताईनगर पोलीस ठाण्यात कायदेशीर फिर्याद दाखल करण्यात आली आहे. सदर कारवाईमुळे वाळू माफियांमध्ये खळबळ उडाली आहे.**



अंतुर्ली परिसरात गस्त घालत असताना तापी नदीकडे जाणाऱ्या कच्च्या व अरुंद रस्त्यावर अवैध रेती वाहतूक करणारा ट्रॅक्टर आढळून आला. सदर ट्रॅक्टर क्रमांक एमच १९ एन ०५३५ (स्वराज कंपनी, लाल रंग)

तहसीलदार गिरीश वखारे यांनी दिलेल्या सरकारी फिर्यादीनुसार, दि.१७ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ९.३० ते १०.०० वाजेच्या सुमारास महसूल पथक व निळ्या रंगाची ट्रॉली असून त्यावर हरी ओम ट्रेलर्स, ता. मलकापूर, जि. बुलढाणा असे लिहिलेले होते. ट्रॅक्टर चालकाकडे चौकशी केली असता त्याने ट्रॉलीमधील रेती नदी पात्रालगत खाली केल्याची कबुली दिली. महसूल पथकाने तात्काळ ट्रॅक्टरची चावी काढून वाहन जागीच थांबवण्याच्या सूचना दिल्या. नदी पात्रालगत पाहणी केली असता तेथे एक ब्रास (सुमारे ५,८०० रुपये किंमतीची) वाळू प्रत्यक्षात आढळून आली. यावेळी मोटारसायकलवर असलेला मुकेश धनगर (हिरो सुपर स्प्लेंडर क्रमांक एमएच १९ डिडि ०७७९) याने ही रेती त्याच ट्रॅक्टरमधून खाली केल्याचे सांगितले. मुकेश धनगर हा महसूल पथकाचा पाठलाग करत असल्याचे दिसून आले असून, त्याने ट्रॅक्टर चालकाला फोनद्वारे महसूल पथक आल्याची खबर देऊन रेती उतार करण्यास सांगितल्याची खात्री पथकाला झाली.

दरम्यान, इतर वाहनांची तपासणी करण्यासाठी महसूल पथक नदी पात्राकडे पायी गेले असता, मागील बाजूस ट्रॅक्टरचा आवाज येताच परत येऊन पाहणी केली असता ट्रॅक्टर तसेच मुकेश धनगर हे दोघेही घटनास्थळावरून पळून गेल्याचे आढळले. कच्च्या रस्त्यामुळे शासकीय वाहन नदीकडे नेता न आल्याने पथकाला पायी तपासणी करावी लागली.

यानंतर अंतुर्ली दूरक्षेत्र येथे लेखी तक्रार देत असताना संजय तुकाराम धनगर हा व्यक्ती तेथे आला. त्याने स्वतःला कथित तालुका अँटी करप्शन संघटनेचा अध्यक्ष असल्याचे सांगून कारवाईबाबत चौकशी केली. मात्र, संघटनेबाबत अधिकृत नोंदणी अथवा ठोस पुरावा सादर न करता केवळ मोबाईलमध्ये कार्डचा फोटो दाखवण्यात आला. पुढील चौकशीत संजय धनगर हा मुकेश धनगरचा काका असून, नरवेल येथील रहिवासी असल्याचे निष्पन्न झाले. पोलीस पाटील नरवेल यांच्या माहितीनुसार, मुकेश व संजय धनगर हे दोघेही अवैध रेती व्यवसायात सक्रिय असल्याची माहिती समोर आली आहे.

तसेच, ट्रॅक्टर क्रमांक एमएच १९ एएन ०५३५ हा संजय धनगरच्या नावे नोंदणीकृत असल्याचे आरटीओकडून स्पष्ट झाले आहे. त्यामुळे कथित अँटी करप्शन संघटनेची भीती दाखवून शासकीय कारवाई रोखण्याचा प्रयत्न केल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे.

**➤ या प्रकरणी मुक्ताईनगर पोलीस ठाण्यात महाराष्ट्र महसूल संहिता कलम ४८ (७), ४८ (८) तसेच भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२) व ६२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस विभागाकडून सुरू आहे. अवैध रेती उत्खननावर महसूल व पोलीस प्रशासनाने संयुक्तपणे कडक कारवाईचा इशारा दिला असून, अशा बेकायदेशीर व्यवसायाला आळा घालण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येणार असल्याचे तहसीलदार श्री. वखारे यांनी सांगितले.**

## थोडक्यात

### दोन वर्षे कैदच्या शिक्षेला स्थगिती न घेतल्यास अपात्र

**जळगाव ।** उमेदवाराला जर दोन वर्षांपेक्षा जास्त कैदेच्या शिक्षेला स्थगिती न मिळाल्यास तो उमेदवार निवडून आल्यास अपात्र ठरेल. असे निवडणुकीच्या नियमावलीत तील नियमाचे वाचन करत असताना निवडणूक निर्णय अधिकारी विनय गोसावी यांनी हे वाक्य बोलल्यानंतर उपस्थित. असलेल्या अनेक इच्छुकांच्या भुया उंचावल्या. आज महापालिके च्या दुसऱ्या मजल्यावर सभागृहात महानगरपालिकेतर्फे इच्छुक असलेल्या उमेदवारांना उमेदवारी अर्ज कसा भरावा व नियमावलीची माहिती व्हावी, नियमांचे काटेकोर पालन व्हावे यासाठी ही बैठक घेण्यात आली होती.


### वाघोदा बु ।। येथे श्रीदत्त पालखी सोहळा

**वाघोदा ।** येथील वाघोदा बु येथे श्री. दत्त जयंतीच्या दिवशी निमित्त शेकडो वर्षा पासुन दत्त पालखीचे आयोजन करण्यात येते. प्रथम सर्व संत महंत मंडळी सर्व श्री संत राज वाघोदकर बाबा दत्त मंदिर चे मुनी श्री कृष्ण मंदिरचे दिवाकर बाबा द्वारकाध्दीश दत्त राज बाबा पालखी सुरूवातीस विडा अवसर व पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्या प्रसंगी प्रा.संजय मोरे व माया संजय मोरे यांनी सपत्नीक पालकीचे पुजन करून दर्शन करून आशीर्वाद घेतला. प्रा. मोरे श्री.संत राज वाघोदकर बाबा दत्त मंदिरचे मुनी श्रीकृष्ण मंदिरचे दिवाकर बाबा द्वारकाधीश दत्तराज बाबा सर्व महंत मंडळी चे शाल श्रीफळ देऊन सत्कार केला व आशिर्वाद घेतला. संध्याकाळी श्रीकृष्ण मंदिर येथुन हजारोच्या संख्येने वाजत गाजत मुख्य मार्गावरून सवाद्य मिरवणुक काढण्यात आली होती. यात्रसंगी मोठ्या संख्येने भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला.

## अमळनेरच्या दाम्पत्याला संरक्षक भिंतीचा पेटंट

प्रतिनिधी । अमळनेर

**भारत सरकारतर्फे संरक्षण भिंत (रिटेनिंग वॉल) क्षेत्रातील त्यांच्या महत्त्वपूर्ण संशोधनाबद्दल बौद्धिक मालमत्ता हक्काचे (पेटंट) प्रमाणपत्र मूळचे अमळनेर तालुक्यातील जवखेडा येथील रहिवासी तथा प्रताप म हाविद्यालयाचे माजी विद्यार्थी डॉ. विकास पाटील आणि वैशाली पाटील यांना (१० डिसेंबर) रोजी प्रदान करण्यात आले. हे दांपत्य हे यापूर्वी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे (सीइओपी) येथे प्राध्यापक म्हणून कार्यरत होते.** सन २००४ मधील त्यांच्या



संयुक्त संशोधनातून निर्माण झालेल्या ग्रॅव्हीलॉफ्ट टेक्नॉलॉजी ला भारत सरकारकडून पेटंट देण्यात आले आहे. भारतीय राष्ट्रीय महाम ार्ग प्राधिकरणाने (एनएचएआय) पुण्यातील चांदणी चौक प्रकल्पात या तंत्रज्ञानाचा वापर केला. या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी ग्रॅव्हीलॉफ्ट तंत्रज्ञानाचे कौतुक करत डॉ. पाटील यांचा सत्कार केला. ग्रॅव्हीलॉफ्ट तंत्रज्ञानाचा वापर सरकारी यंत्रणांसह टाटा हाऊसिंग, पेनिन्सुला ग्रुप, लोढा ग्रुप यांसारख्या अनेक खाजगी कंपन्यांनी त्यांच्या प्रकल्पांमध्येही केला आहे. नवीन पेटंट हायब्रिड रिटेनिंग वॉल अँड मेथड फॉर कंस्ट्रेटिंग इट अंतर्गत डॉ. पाटील यांनी त्यांच्या ३५ वर्षांच्या व्यावसायिक अनुभवाचा उपयोग करून उंच संरक्षण भिंतींच्या सुरक्षितता, टिकाऊपणा आणि शाश्वतता या अत्यंत महत्त्वाच्या घटकांवर आधारित अत्याधुनिक तंत्रज्ञान विकसित केले आहे.

## दबापिंप्री जि.प. प्राथ. शाळेत बाल आनंद मेळावा

प्रतिनिधी । पारोळा

**तालुक्यातील दबापिंप्री येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत बाल आनंद मेळावा घेण्यात आला. विद्यार्थ्यांना शैक्षणिक ज्ञाना बरोबरच देवाण-घेवाण विशिष्ट व्यापाराची तसेच बचतीची आणि व्यवहाराचे ज्ञान प्राप्त व्हावे, यासाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी आज बाल आनंद मेळाव्याचे आयोजन करीत ४० ते ४५ स्टॉल लावले.**



या स्टॉलवर प्रत्येक विद्यार्थ्याने वेगवेगळे मेनू तयार केलेले स्टॉल लावण्यात आले होते. या स्टॉलमध्ये खमण, पाववडा, भजी, लाडू, मुरमुरा लाडू, चिवडा, बर्फी, तिळीचे लाडू, समोसा, चहा, कुरकुरे, वेफर्स, चकली, पाणीपुरी, भेळ, रगडा, तसेच नवनवीन वेगळ्या पद्धतीचे पदार्थ बनवून विद्यार्थ्यांनी आपापली स्टॉल उभारली होती. बाल आनंद मेळाव्याचे सकाळी ८.३० वाजता उद्घाटन करण्यात आले. मान्यवरांनी उद्घाटन करून विद्यार्थ्यांनी रांगोळी स्पर्धा देखील आयोजित केली होती आणि या रांगोळ्यांची मान्यवरांनी पाहणी करून विद्यार्थ्यांचे कौतुक केले. त्यानंतर शालेय आवारात ७० ते ७५ खवय्येगिरीचे स्टॉल प्रत्येक स्टॉलवर मान्यवरांनी तसेच रत्नापिंप्री, दबापिंप्री, होळपिंप्री येथील ग्रामस्थांनी तसेच विद्यार्थ्यांच्या पालकांनी हजेरी लावली. याबरोबरच श्री यशवंत माध्यमिक विद्यालयाचे सर्व विद्यार्थी तसेच रत्नापिंप्री जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे विद्यार्थी शिक्षक यांनी देखील प्रत्येक स्टॉल वर जाऊन खवयगिरीच्या आस्वाद घेतला. विद्यार्थ्यांचे कौतुक करीत विद्यार्थ्यांनी स्टॉलवर देवाण-घेवाणीच्या व्यवहार कशा पद्धतीने केला. याबाबत कौतुक करण्यात आले.

## वाकडी गरुड विद्यालयात गजाननराव गरुड पुण्यतिथी साजरी

प्रतिनिधी । जामनेर

**तालुकक्यातील वाकडी येथील अण्णासाहेब भास्करराव खंडेराव गरुड माध्यमिक विद्यालयामध्ये धी शेंदुर्णी एज्युकेशन को ऑप सोसायटीचे प्रेरणास्थान कै. आचार्य गजाननराव गरुड यांची ४१ वी पुण्यतिथी साजरी करण्यात आली. तसेच स्वच्छता अभियानाचे प्रणेते थोर समाज सुधारक संत गाडगे बाबा यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली.**



यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान स्थानिक सल्लागार समिती सदस्य रामेश गायकवाड यांनी भूषविले असता. बापूंच्या पुण्यस्मरणार्थ विद्यालयात वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. सर्व प्रथम अध्यक्ष व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्यालयाच्या प्रांगणातील माता सरस्वती व कै. आचार्य बापूसाहेब गजाननराव गरुड यांच्या पुतळ्याचे पूजन करून माल्यार्पण केले. त्याचप्रमाणे व्यासपीठावरील पू. हरिप्रसाद महाराज, कै. आचार्य बापूसाहेब गजाननराव गरुड, कै. अण्णासाहेब भास्करराव गरुड, कै.डी.टी. गायकवाड यांच्या प्रतिमांचे पूजन करून माल्यार्पण केले. यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक पी.एस. पाटील यांनी प्रास्ताविक केले. व बापूसाहेबांच्या सामाजिक शैक्षणिक व राजकीय कार्याचा गौरव करून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. वक्तृत्व स्पर्धेच्या लहान गटातील प्रथम तीन व मोठ्या गटातील प्रथम तीन विजयी स्पर्धकांना बक्षिसे देऊन सत्कार करण्यात आला.

**➤ या कार्यक्रमाला उपस्थित गोकुळसिंग भोपळावद, सुनील घुगे, घनश्याम पाटील (पो.पा.) सामाजिक कार्यकर्ते प्रवीण गायकवाड, युवराज बिजागरे, विकास सोसायटी चेअरमन मुस्ताक शहा रशीद शहा, राजेश चांदणे, राजेंद्र परदेशी, एस. के. सुरवाडे, तेजराव ठोंबरे, प्रतापसिंग जावरीया, गणेश सोनवणे व प्रतिनिधी ज्ञानेश्वर घुगे आदी मान्यवर व विद्यालयाचे मुख्याध्यापक सर्व शिक्षक शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थिती देऊन आचार्य बापूसाहेबांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले.**

## रेल्वेच्या जबर धडकेत वृध्दाचा मृत्यू; आशाबाबानगर परिसरातील घटना

प्रतिनिधी । जळगाव

**मॉर्निंग वॉकसाठी गेलेल्या संजय श्रावण काळे (वय ५२, रा. कोठारी नगर, हरिविठ्ठल नगर) यांना धावत्या रेल्वेची धडक लागून त्यांचा मृत्यू झाला. ही घटना दि. २१ डिसेंबर रोजी सकाळी सहा वाजेच्या सुमारास आशाबाबा नगरजवळील टॉवरसमोरील रेल्वे रुळावर घडली. ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद याप्रकरणी रामानंद नगर पोलीस करण्यात आली आहे.**

शहरातील कोठारी नगरात संजय श्रावण काळे हे वास्तव्यास आहे. नेहमीप्रमाणे रविवार दि. २१ रोजी सकाळच्या सुमारास ते मॉर्निंग वॉकसाठी घराबाहेर पडले. यावेळी आशाबाबा नगरासमोरील टॉवरसमोरील खांबा क्रमांक ४१६/२४ दरम्यान, त्यांना धावत्या रेल्वेची धडक लागून त्यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती रामानंद नगर पोलिसांना मिळताच पोहेकॉ अजित पाटील व नीलेश पाटील यांनी लागलीच घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी पंचनामा करुन मृतदेह तत्काळ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात दाखल केला. याठिकाणी वैद्यकीय अधिकारी सीएमओ डॉ. अश्विन देवचे यांनी तपासणी करीत मयत घोषीत केले. काळे यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले व मुलगी असा परिवार आहे.

## रांगोळी स्पर्धेत दीपाली पाटील यांचे यश

प्रतिनिधी । जळगाव

शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागामार्फत शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या रांगोळी स्पर्धेत शिरसोली येथील बारी समाज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील उपशिक्षिका दीपाली कल्याणराव पाटील यांनी नाशिक विभागातून प्रथम क्रमांक पटकावून सुवर्णयश संपादन केले आहे.

## बालकांच्या न्यायासाठी भडगाव बंदची हाक

### • दोन बालकांच्या मृत्यूप्रकरणी सर्वपक्षीय एकवटले

प्रतिनिधी । भडगाव

**येथील महात्मा फुले शिक्षण मंडळाच्या आदर्श इंग्लिश स्कूल मीडियम स्कूलच्या नर्सरीच्या (बालवाडीतील) दोन बालकांचा कल्याण कोल्या नाल्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना घडली होती. या घटनेसंदर्भात दोषीवर कठोर कारवाई करण्यात यावी, बालकांना न्याय मिळावा. या मागणीसाठी भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे शनिवारी (ता.२०) भडगाव बंदची हाक देण्यात आली होती.**



या बंदच्या आव्हानाला प्रतिसाद येथील व्यापारी, दुकानदारांनी व छोटे-मोठे हात व्यवसायवाले स्वयंसमूर्तीने १०० टक्के कडकडीत बंद पाडण्यात आला. यावेळी पोलिसांचा बंदोबस्त ठेवण्यात आला होता.मृत बालकांच्या नातेवाईकासह व भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस, तहसीलदारांना निवेदन आदर्श इंग्लिश मीडियम स्कूल येथील निष्काळजीपणामुळे बळी गेलेल्या दोन चिमुकल्यांच्या न्यायाबाबत तहसीलदार शीतल सोलाट यांना भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे निवेदन देण्यात आले आहे. निवेदनात म्हटले की १६ डिसेंबरला आदर्श इंग्लिश मीडियम स्कूल नर्सरी शिकत असलेले अंश तहसीलदार व मयंक वाघ या चार वर्षीय बालकांचे शाळेच्या व्यवस्थापन समिती व शिक्षकांच्या निष्काळजीपणामुळे थेट वर्गाच्या हजरीपटावर हजर असताना ३ तास वर्गातून या विद्यार्थ्यांकडे दुर्लक्ष करून त्यांच्यावर काळजीपूर्वक लक्ष न दिल्याने त्यांना मृत्यूच्या दारात जाणीवपूर्वक ढकलण्यात आल्याचे दिसून येत आहे. तरी संस्थाध्यक्ष, सचिव, संचालक मंडळासह वर्गशिक्षक मुख्याध्यापक यांच्यासह सर्वांवर कारवाई करावी. घटनेतील गुन्हा दाखल झालेल्या सर्वांना अटक केल्याशिवाय जमीन देण्यात येऊ नये. फरार संशयित यांना अटक करावी. संचालक मंडळ बरखास्त करून यावर प्रशासकाची नेमणूक करावी.

शाळेबद्दल गेल्या गेलेल्या स्थळ परीक्षणात शौचालय व इमारती संदर्भात केलेल्या परीक्षण अहवालाची मागणी करून शिक्षण विस्तार अधिकारी, प्रमुख व इतर जबाबदार अधिकाऱ्यांना निलंबित करून यांच्यावर योग्य ती कारवाई व्हावी, आदर्श इंग्लिश मीडियम स्कूल व परिसरातील बांधकामे ही नाल्याच्या अतिक्रमित जागेत नाल्यातील पाण्याच्या मुख्य प्रवाह बदलून भरावा केलेला जागेत केलेल्या बांधकामाची नगरपरिषद मार्फत दिलेल्या परवानगीची योग्य ती चौकशी करून कारवाई व्हावी. यासह इतर प्रमुख मागण्या निवेदनात करण्यात आल्या.

## एसटी बस थांबवली नाही म्हणून नाक घासून मागायला लावली माफी..!

### • मुक्ताईनगरमध्ये कोथळी गावाजवळ बसचालकाला घडवली अद्दल

प्रतिनिधी । मुक्ताईनगर

**एसटी बस थांबवली नाही या क्षुल्लक कारणावरून मुक्ताईनगर आगाराच्या बस चालकाला अडवून त्याला लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आली. इतकेच नव्हे तर, गुंडगिरी करत आरोपींनी चालकाला पाय धरून आणि नाक घासून माफी मागण्यास भाग पाडले. या धक्कादायक घटनेमुळे एस. टी. महामंडळाच्या कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.**



फिर्यादी जीवन सुभाष सुरवाडे (वय ३५, रा. कुऱ्हा, ता. भुसावळ) हे मुक्ताईनगर आगारात बस चालक म्हणून कार्यरत आहेत. शुक्रवारी, १९ डिसेंबर रोजी ते फैजपूर ते मुक्ताईनगर या मार्गावर प्रवाशांना घेऊन बस (सावदा-उदळी-चिंचोली-चांगदेव मार्गे) जात होते. संध्याकाळी ७:३० वाजेच्या सुमारास वढवे फाटा ते हरताळा फाटा दरम्यान आरोपींनी बसला फ्लॅश लाईट देऊन थांबवण्याचा इशारा केला होता. बस थांबवली नाही या रागातून आरोपी अंकुश राजेंद्र चौधरी (रा. चांगदेव) आणि त्याच्यासोबत असलेल्या इतर ३ अनोळखी साथीदारांनी आपल्या ताब्यातील पांढऱ्या रंगाची कार कोथळी गावाजवळील आशादेवी मंदिराजवळ बसच्या आडवी लावली.

आरोपींनी चालक जीवन सुरवाडे यांना खाली उतरवून अश्लील शिवीगाळ केली. तसेच लाथाबुक्क्यांनी व चापटांनी बेदम मारहाण केली.

आरोपींनी एवढ्यावरच न थांबता, शासकीय कर्तव्यावर असलेल्या चालकाला धाक दाखवून त्यांना पाय धरून आणि जमिनीवर नाक घासून माफी मागण्यास लावली. भररस्त्यात घडलेल्या या प्रकारामुळे खळबळ उडाली आहे.

याप्रकरणी चालक जीवन सुरवाडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून मुक्ताईनगर पोलीस ठाण्यात अंकुश चौधरी व ३ अनोळखी व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक आशिष आडसूळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेड कॉन्स्टेबल चंद्रकांत बोदडे या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत. आरोपी अद्याप फरार असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत.

## पहूर येथे आज किडनी विकार निदान शिबिर

प्रतिनिधी । पहूर, ता. जामनेर

**येथे भव्य किडनी विकार निदान शिबिर संपन्न झाले. आई मल्टीस्पेशालिटी डे केअर सेंटर डॉक्टर रवींद्र बडगुजर यांच्या दवाखान्यात क्षत्रिय माळी समाज संघटना पहूर कसबे व हरिकृपा किडनी केयर अँड डायलेसिस सेंटर जळगाव यांचे संयुक्त विद्यमाने जळगाव येथील प्रसिद्ध किडनी विकार तज्ञ डॉ. स्वप्नील भारंबे किडनी विकार तज्ञ व ट्रान्सप्लांट फिजिसियन यांनी या शिबिरात ६८ रुग्णांची तपासणी करण्यात आली.**

यावेळी प्रसिद्ध किडनी विकार तज्ञ डॉ. स्वप्नील भारंबे, मधुकर लहासे यांनी मनोगत व्यक्त केले. आभार पत्रकार रवींद्र लाठे यांनी मानले. शिबिरात तपासणी पूर्णपणे मोफत करण्यात आली असून रक्त तपासणी व लघवी तपासणी वर ५०% डिस्काउंट देण्यात आला. सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत आयोजित करण्यात आले. यात एकूण ६८ रुग्णांची तपासणी करण्यात आली. या किडनी विकार निदान शिबिरासाठी पहूर मेडिकल प्रॅक्टिशनर असोसिएशन, पहूर मेडिकल असोसिएशन व युनिटी लॅब तो संचालक डॉ. बोरसे व डॉ. जलाल शेख यांचे अनमोल सहकार्य लाभले.